जलसंपदा विभागांतर्गत पावसाळयात पुरनियंत्रण कक्षामध्ये काम करतांना पुढील प्रमाणे नियम पाळावे.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शासन परिपत्रक .क्र , पुरनि- २०१९/प्र.क्र.१९६/२०१९/सिं.व्य.(महसूल)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक -: २८ जून, २०१९

संदर्भ: पुरनि २०१९ /(प्रक्र.१४१/२०१९)/सिंव्य.(महसूल) दिनांक ३ जून, २०१९

प्रस्तावना:

पावसाळयामध्ये महसुल व वन विभागाच्या अधिनस्त असलेल्या मंत्रालयीन नियंत्रण कक्षामध्ये पुर नियंत्रणाच्या संनियंत्रणासाठी जलसंपदा विभागामार्फत दिनांक १ जून, २०१९ ते ३१ ऑक्टोबर, या कालावधीकरीता अधिकारी/कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात येते. पूर नियंत्रणकक्षामध्ये काम करतांना पुढील प्रमाणे नियम पाळण्याबाबत परिपत्रक निर्गमित करणे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन परिपत्रक :

१) महाराष्ट्र राज्यातील जलसंपदा विभागांतर्गातील खोरे निहाय Whats app ग्रुप तयार करणे. सदर ग्रुपची निर्मिती पूर नियंत्रण कक्ष, मंत्रालय यांचेव्दारे केली जाईल. त्यात सचिव, कार्यकारी संचालक संबधित मुख्य अभियंता व पूर नियंत्रण कक्षातील in-charge officer असेल . पुरनियंत्रणाबाबत वेळोवेळी अपडेट (Updates) करण्यात यावेत.

२) धरणातून सोडण्यात आलेला विसर्ग व पडलेला पाऊस पूर्ण जलसंचय पातळी व सध्याची पाणी पातळी यांची माहिती दर ४ तासांनी Update करण्यात यावी.

३) माहिती Update करण्याबाबतची जबाबदारी खो-याच्या पूर नियंत्रण कक्षातील In charge Engineer यांची असेल.

४) Fool Control या युनिटसाठी एक नवीन मोबाईल घेण्यात यावा तो २४ X ७ पूरनियत्रंण कक्षातच कार्यरत असेल की जेणे करुन कायमस्वरुपी संपर्कात राहणे शक्य होईल.

५) पूरनियंत्रण कक्षातील पाळी (Duty) बदल असताना Mobile वर Update करुनच duty संपवावी व नवीन येणा-या अभियंत्यास Mobile हस्तांतरीत करण्यात यावा.

६) पूरनियंत्रण कक्षात wireless यंत्रणा सज्ज ठेवण्यात यावी.

७) सदरच्या Mobile Group वर अतिपर्जन्य, ढगफूटी तसेच धरण फुटणे बाबतच्या घटना त्वरीत Update करण्यात याव्यात तसेच ग्रुप मेंबर नी त्यांचे कडील माहिती व मत त्यावर व्यक्त करीत जावे.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०६२८१२४२२४९७२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhakar Nageshrao Aivale

Digitally signed by Sudhakar Nageshrao Aivale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2cc5f92716ab534e424b50ac729583cabc178f93f59c9d32f0507cd1020c53d3, cn=Sudhakar Nageshrao Aivale
Date: 2019.06.28 12:50:35 +05'30'

(सु.ना. ऐवळे)
शासनाचे अवर सचिव

प्रत

१) प्रधान सचिव, (जसं) यांचे स्वीय सहायक जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) सचिव (लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव (प्र.समन्वय) यांचे स्वीय सहायक जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
४) कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
५) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई
६) अधीक्षक अभियंता उत्तर कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, कळवा, ठाणे
७) अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे.
८) कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवड नस्ती सिंव्य महसूल